**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १८/२०२० मधील नि.१६ वरील आदेश</u>**

१. वादी यांनी सदरचा अर्ज सी.पी.सी. ऑर्डर २२ कलम ४ प्रमाणे मयत प्रतिवादी नं. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता दाखल केला आहे. वादींनी प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेबाबतचा दाखल केला आहे. वादी यांनी याकामी आवश्यक पक्षकार म्हणुन वादी व प्रतिवादी यांचे कायदेशीर वारस याकामी सामील केलेले आहेत. तथापि सदर कामातील प्रतिवादी नं. २ ही प्रतिवादी नं. १ यांची आई होती. तसेच प्रतिवादी नं. ३ ची सासु व प्रतिवादी नं. ४ व ५ ची आजी तसेच वादी नं. १ व २ ची पंजी तसेच वादी नं. ३ आजी सासु होती. त्याप्रमाणे वादी यांनी सदर दावेकामी दावा कलम २ मध्ये वंशावळ देखील नमुद केलेली आहे.

२. यातील प्रतिवादी नं. २ पारुबाई ज्ञानु खताळ ह्या दि. ०६/०५/२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र वादीस दि. ०७/०६/२०२२ रोजी प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे वादी यांनी तात्काळ सदरचा अर्ज करुन त्याप्रमाणे मयत प्रतिवादी नं. २ यांचे नावापुढे मयत लिहणेस तसेच दावा कलम २ मधील वंशावळीमध्ये प्रतिवादी नं. २ चे नावापुढे 'मयत' लिहणेस तसेच त्याप्रमाणे दुरुस्ती होणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरकामी यातील प्रतिवादी नं. २ ह्या दि. ०६/०५/२०२२ रोजी मयत झालेल्या असुन त्यांचे कायदेशीर वारस यापुर्वीच रेकॉर्डवर आहेत. त्यामुळे त्यांचे नावापुढे 'मयत' लिहणेस व त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी असावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादीच्या विधीज्ञांनी हरकत घेतली व आपले म्हणणे दाखल

केला की, सदरील अर्ज हा खोटा व लबाडीचा आहे. तो फेटाळण्यात यावा. अशी विनंती केली.

४. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा वादींनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. २ पारुबाई ज्ञानु खताळ ह्या दि. ०६/०५/२०२२ रोजी मयत झाल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. तसेच त्याबाबतचा वादीच्या मृत्यू दाखल्याची प्रत नि. १५ फेरीस्तसोबत दाखल केले आहे. वादीने वारस रेकॉर्डवर मुदतीत घेत असल्याचे शपथेवर नमुद केलेले आहे. यावरून वादीच्या सांगण्यात सत्यता असल्याचे पटते व सदरचे कारण योग्य वाटते.

४. मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी नं. २ पारुबाई ज्ञानु खताळ ह्या दि. ०६/०५/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते व सदरचा अर्ज हा ९० दिवसांच्या मुदतीत दाखल झाले असल्याचे दिसुन येते. प्रतिवादींविरुध्द दावा चालविण्याचा अधिकार संपुष्टात येत नाही. सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेचा दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. २ चे वारस अगोदरच अभिलेखावर आहेत. त्यामुळे वादीचा मागणी केल्याप्रमाणे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

३. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

५. संबंधित लिपीक यांनी सदर दुरुस्तीची नोंद दावा नोंदणी रजिस्टर व संगणक प्रणालीमध्ये करुन घ्यावी.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2022.07.25 17:46:53 +0530

आटपाडी. **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक २५/०७/२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.,

आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 25.07.2022
Order signed by the
Presiding Officer on - 25.07.2022
Order uploaded on - 25.07.2022